सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : ३०१ | गुरुवार, दि. २३ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

सोने-चांदी
आजचे भाव

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १४३००० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १३२००० |
| १८ सोने ७५.००% | ₹ ११०००० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २२९०/- |

भाव प्रती १० ग्रॅम

# अजितदादांचा पुतळा शेतकऱ्यांना सदैव ऊर्जा व प्रेरणा देईल

## आमदार अनिलदादा पाटील : 'कृउबा'त महाराष्ट्रातील पहिल्या पुतळ्याचे पूजन व लोकार्पण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचा महाराष्ट्रातील पहिला पुतळा शेतकरी रूपात तसेच स्मारक येथील बाजार समितीत उभारले गेले आहे. हा पुतळा व स्मारक शेतकऱ्यांना सदैव कामासाठी ऊर्जा, धैर्य आणि वक्तशीरपणाची प्रेरणा देत राहील, असा विश्वास माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांनी व्यक्त केला.

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात बुधवार, दि. २३ जुलै रोजी स्व. अजितदादांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आमदार पाटील यांच्या मार्गदर्शनातून सभापती अशोक आधार पाटील व संचालकांनी बाजार समितीत शेतकरी रूपात बैलगाडीवर आरूढ अजितदादा पवार यांचा पुतळा व स्मारक उभारण्यात आले आहे. हा पुतळा आणि स्मारक आज जनतेसाठी खुले करण्यात आले.

तत्पूर्वी, आमदार पाटील यांच्या हस्ते पुतळा व स्मारकाचे पुष्पार्पण करून पूजन करण्यात आले. तसेच बाजार समितीत शेतकऱ्यांसाठीच्या विविध योजना आणि लाभ मिळविण्यासाठीच्या मोफत म्हणजे फक्त शासकीय शुल्कात सेवा देणाऱ्या बळीराजा सुविधा केंद्राचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते करण्यात आले.

सभापती अशोक पाटील म्हणाले, की स्व. अजितदादा पवार हे महाराष्ट्राच्या विकासाचे दिशादर्शक नेते होते. त्यांच्या प्रेरणेतून आणि आमदार अनिलदादा यांच्या माध्यमातून तालुक्याचा कायापालट होत आहे. त्यामुळे त्यांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी आणि शेतकऱ्यांसह कार्यकर्त्यांना बळ मिळण्याच्या उद्देशातून हा पुतळा व स्मारक उभारण्यात आले आहे. आगामी काळात उभारण्यात येणाऱ्या व्यापारी संकुलालाही स्व. अजितदादा पवारांचेच नाव देण्याचा मानस आहे.

या कार्यक्रमास माजी नगराध्यक्षा व 'शविआ'च्या गटनेत्या सौ. जयश्रीताई पाटील सौ. जयश्रीताई पाटील, बाजार समितीचे उपसभापती सुरेश पिरन पाटील, संचालक सचिन पाटील, संचालिका सौ. सुषमाताई देसले, भोजमल पाटील, समाधान धनगर, भाईदास भिल, डॉ. अनिल शिंदे, हिरालाल पाटील, शरद पाटील, प्रकाश वाणी, शेतकी संघाचे अध्यक्ष संभाजी पाटील, उपाध्यक्ष गणेश भामरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत पाटील, शहराध्यक्ष चेतन राजपूत, प्रा. मंदाकिनी भामरे, नगरसेविका सौ. रिताताई बाविस्कर, श्रीमती शोभाताई गढरे, नगरसेवक राजू फापोरेकर, सौ. आशाताई चावरिया, सौ. अलकाताई पवार, सौ. कविताताई पवार, सुरेश विक्रम पाटील, एल. टी. पाटील, जितेंद्र ठाकूर, मुख्तार खाटीक, हेमंत पवार, जितेंद्र झाबक, निलेश भांडारकर, अनिल अहिरराव, दिनेश शेलकर, अलीम मुजावर, गौरव पाटील, डॉ. उन्मेष राठोड आदी उपस्थित होते. अर्बन बँकेचे माजी व्हॉ. चेअरमन रणजीत शिंदे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

### ठिकठिकाणी झाले कार्यक्रम

शहरातील विविध प्रभागांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या शाखांचे उदघाटन तथा फलक अनावरण आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. आर के नगर, पिंपळे रोड, ढेकू रोड, मिलचाळ, तांबेपुरा, गांधलीपुरा, कुंटे रोड, माळीवाडा व पैलाड आदी भागात राष्ट्रवादी शाखेचे उद्घाटन करण्यात आले. तर सायंकाळी छत्रपती शिवराय, पूज्य सानेगुरुजी, नेताजी सुभाषचंद्र बोस, डॉ बाबासाहेब आंबेडकर आदी महापुरुषांच्या पुतळ्यास माल्यार्पण व अभिवादन करण्यात आले. त्यानंतर अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघात आमदारांच्या हस्ते स्वर्गीय अजितदादा यांच्या प्रतिमेचे पूजन होऊन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शेतकी संघाच्या वतीने ग्रामिण रुग्णालयात रुग्णांना फळवाटप करण्यात आले.

(सविस्तर वृत्त उद्याच्या अंकात)




*अमळनेर : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात बुधवार, दि. २३ जुलै रोजी स्व. अजितदादांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी स्मारकावर पुष्पार्पण करताना माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील. शेजारी बाजार समितीचे सभापती अशोक पाटील, उपसभापती सुरेश पिरन पाटील, माजी नगराध्यक्षा व 'शविआ'च्या गटनेत्या सौ. जयश्रीताई पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत पाटील आदी.*



*अमळनेर : येथील जी. एस. हायस्कूलचे उपशिक्षक उमाकांत हिरे यांची राष्ट्रवादी काँग्रेस शिक्षक सेलच्या अमळनेर शहराध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करताना माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील. शेजारी शहराध्यक्ष चेतन राजपूत, निलेश महाजन, प्रकाश जैन, आर. जे. पाटील, शिक्षक भारती संघटनेचे तालुकाध्यक्ष विशाल वाघ, साने गुरुजी पतपेढीचे संचालक रोहित तेले, राहुल पाटील.*

# राष्ट्रवादी काँग्रेस शिक्षक सेलच्या अमळनेर शहराध्यक्षपदी उमाकांत हिरे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील जी. एस. हायस्कूलचे उपशिक्षक उमाकांत अशोकराव हिरे यांची राष्ट्रवादी काँग्रेस शिक्षक सेलच्या अमळनेर शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या शिफारशीनुसार राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन राजपूत यांनी सदरची नियुक्ती केली आहे. आमदार पाटील यांच्या हस्ते त्यांना नुकतेच नियुक्तीपत्र देण्यात आले.

यावेळी शहराध्यक्ष राजपूत, निलेश महाजन, प्रकाश जैन, आर. जे. पाटील, शिक्षक भारती संघटनेचे तालुकाध्यक्ष विशाल वाघ, साने गुरुजी पतपेढीचे संचालक रोहित तेले, राहुल पाटील यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस शिक्षक सेलच्या माध्यमातून शिक्षकांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे याप्रसंगी उमाकांत हिरे यांनी सांगितले.

# मुख्यमंत्री फडणवीसांच्या वाढदिवसानिमित्त अनुलोम परिवारातर्फे सामाजिक उपक्रम

## देववृक्ष अभियानांतर्गत ५६ हजार वृक्षारोपण संकल्पालाही पाठिंबा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त बुधवार, दि. २२ जुलै रोजी अनुलोम परिवारातर्फे येथे विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. राज्यभर राबविण्यात येणाऱ्या देववृक्ष अभियानांतर्गत ५६ हजार वृक्षारोपणाच्या संकल्पाला पाठिंबा देत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याचाही संकल्प करण्यात आला.

याच निमित्ताने शहरातील संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थानानजीक टाळ-मृदंगाच्या पारंपरिक संकल्पनेवर आधारित भव्य रांगोळी साकारण्यात आली. आकर्षक रांगोळीने नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. महिला मंडळातर्फे ५६ दिवे प्रज्वलित करून फडणवीसांना शुभेच्छा अर्पण करण्यात आल्या. तसेच बाल वारकरींनी अभंग, टाळ-मृदंगाच्या गजरात आनंदोत्सव साजरा करत मुख्यमंत्री फडणवीसांना शुभेच्छा दिल्या. तसेच उपस्थित लाडक्या बहिणींनीही त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या.

अनुलोम मित्र अभिषेक पाटील यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास भाग जनसेवक मनोहर सोनवणे, संवादिनी भाविका पाठक, संवादिनी संगीता पाटील, अनुलोम मित्र गणेश पाटील आणि अभिषेक भावसार यांनी विशेष सहकार्य केले. या सर्व उपक्रमांतून पर्यावरण संवर्धन, सामाजिक बांधिलकी आणि भारतीय संस्कृतीचा संदेश देत मुख्यमंत्री फडणवीस यांना आगळ्यावेगळ्या पद्धतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.




*अमळनेर : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त बुधवार, दि. २२ जुलै रोजी अनुलोम परिवारातर्फे शहरातील संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थानानजीक लाडक्या बहिणींनी टाळ-मृदंगाच्या पारंपरिक संकल्पनेवर आधारित भव्य रांगोळी साकारण्यात आली.*

# अमळनेर, जळगावच्या दोघांना सोळा लाखांचा गंडा

## टेलिग्राम चॅनलवरून पैसे गुंतविण्याच्या आमिषाचे ठरले बळी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील ढेकू तांडा येथील एक जण व जळगाव येथील एकाला टेलिग्राम चॅनलवरून पैसे गुंतविण्याचे आमिष दाखवत एकूण सोळा लाख रुपयांना गंडविल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे.

तालुक्यातील ढेकू तांडा येथील रणजीत दशरथ पवार (वय ३०) प्लॅटिनम डिव्हिजन टेलिग्राम चॅनल, कस्टमर केयर चॅनल आणि मृदल गुप्ता या चॅनल ॲडमिनकडून १३ जुलै ते १८ जुलै २०२६ दरम्यान वारंवार संपर्क करून प्रॉडक्ट ऑप्टिमायझेशन या कंपनीत टास्क पूर्ण करण्यासाठी पैसे गुंतवण्याकरिता मार्गदर्शन करून विश्वास संपादन केला. त्यानंतर त्यांच्याकडून विविध खात्यांत सहा लाख ४५ हजार ९०९ रुपये वर्ग करून घेतले. रणजीत पवार यांची फसवणूक झाल्याबाबत तसेच जळगाव येथील सिद्धिविनायक पार्कमधील मयूर हेमंत व्यास (वय २८) यांनाही नायकामॉल टास्क, ओसीस स्टॉक मार्केट, ओसीस फायनान्शियल अशा विविध टेलिग्राम चॅनलकडून संपर्क करण्यात आला व शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतविण्याचे आमिष दाखवून त्याच्याकडून नऊ लाख ५६ हजार ९०० रुपये विविध खात्यांत मागून घेतले. कोणताही परतावा न मिळाल्याने त्यांची फसवणूक झाल्याची खात्री पटल्यावर त्यांनी जळगाव सायबर क्राइमला गुन्हा दाखल केला. त्यावरून पोलीस निरीक्षक प्रदीप ठाकूर तपास करीत आहेत.




### आजचे अभीष्टचिंतन



श्री. पुनम कोचर
माजी अध्यक्ष, रोटरी क्लब



श्री. अभय गोहिल
अमळनेर



श्री. रोनक संकलेचा
नवकार बिझनेस ग्रुप

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेव्हा-तेव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

### दिनविशेष
२३ जुलै

- बॉम्बेमध्ये रेडिओ क्लबने पहिले रेडिओ प्रसारण सुरू केले, जे नंतर आकाशवाणीमध्ये विकसित झाले.
- हिपॅटायटीस बी लसीची सुरुवात.
- हेल-बॉप धूमकेतूचा शोध.

### श्रीक्षेत्र कपिलेश्वर महादेव मंदिरात तापीमाईचा जन्मोत्सव

पान २ वर

## संपादकीय

# आरोग्य क्षेत्रातील उदासीनता आणि विश्वासार्हता

डॉक्टरांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या विरोधात संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. डोंबिवली येथील शास्त्रीनगर भागातील महापालिका रुग्णालयात स्थानिक नगरसेवक रमेश म्हात्रे आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांनी तेथील डॉक्टर आणि अधिकाऱ्यांवर हल्ला केला. हा प्रकार घडल्यानंतर संबंधित हल्लेखोरांवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली गेली. परंतु राजकीय दबावामुळे यासंदर्भात बरीच चालढकलही केली गेली. ज्या पद्धतीने डॉक्टर आणि परिचारिकांना मारहाण केली गेली, तो सगळा प्रकार स्वाभाविकपणे वैद्यकीय क्षेत्रातील सगळ्यांमध्येच चिंतेचे वातावरण निर्माण करणारा ठरला. इतक्या उघडपणाने दहशत माजवून हिंसाचाराचा प्रकार होत असेल तर त्यासंदर्भात अत्यंत वेगाने कारवाई होणे गरजेचे ठरते. आता रमेश म्हात्रे आणि त्याच्या सहकाऱ्यांचा जामीन फेटाळला असला, तरी डॉक्टरांवर होणाऱ्या हल्ल्याच्या विरोधात आता अधिक कठोर उपाययोजनांची मागणी वैद्यकीय क्षेत्रातून केली जात आहे. आणि याच मागणीसाठी राज्यभर चोवीस तासांच्या बंदची हाकही दिली गेली होती. रमेश म्हात्रे पोलिसांना शरण आला आणि हायकोर्टाने देखील संप न करण्याचे आवाहन केले होते. त्याला अनुसरून चोवीस तासांचे बंद आंदोलन डॉक्टर संघटनांनी स्थगित केले आहे. मात्र, यानिमित्ताने एकूणच वैद्यकीय क्षेत्रातील अस्वस्थता आणि काम करतानाची असुरक्षितता पुन्हा एकदा ऐरणीवर आलेली आहे. आरोग्य किंवा वैद्यकीय क्षेत्र हे अत्यंत महत्त्वपूर्ण आणि तितकेच संवेदनशील आहे. डोंबिवलीतील या डॉक्टरांवरील हल्ल्याचे प्रकरण शासनाने अधिक गांभीर्याने हाताळले पाहिजे. पूर्णपणे राजकीय बळाचा वापर करून दहशत निर्माण करणाऱ्या या झुंडशाहीच्या मुसक्या कायमच्या आवळण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. स्वतः मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची दखल घेऊन मंत्रिमंडळ बैठकीत सध्या असलेल्या कायद्यांमध्ये सुधारणा करण्याचा आणि रुग्णालयांमध्ये स्वतंत्र सुरक्षा व्यवस्था निर्माण करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सरकार याबाबतीत किती वेगाने निर्णय घेते हे येणाऱ्या काळात कळेलच. परंतु एकूण सरकारची भूमिका ही फारशी सकारात्मक वाटत नसल्याने राज्यभरातील डॉक्टरांना चोवीस तास म्हणजे एकदिवसीय आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागणार होता.

डॉक्टरांनी सुरक्षिततेची मागणी केली असतानाच सरकारी रुग्णालयातील दुर्दशेकडे सरकारचे लक्ष वेधले आहे. दुर्दैवाने सरकारी रुग्णालयांमध्ये बऱ्याच साधनसामुग्रीची कमतरता असते. अगदी पुरेसा आणि तज्ज्ञ कर्मचारी वर्ग उपलब्ध न होण्यापासून ते औषधांचा साठाही अपुरा असण्यापर्यंत अनेक गोष्टी घडतात. तातडीच्या उपचारादरम्यान या सगळ्या तुटवड्याचे काही ना काही परिणामही होतात. म्हणूनच डॉक्टर घटनांनी सरकारला दिलेल्या निवेदनामध्ये शासकीय रुग्णालयातील अपुऱ्या व्यवस्थांबाबतही सरकारकडे तक्रार केलेली आहे. याचा अर्थ अशा अर्धवट आणि अपुऱ्या व्यवस्थांमध्ये तेथील डॉक्टरांना उपचार करणे भाग पडते. म्हणजेच उपचारांमध्ये काही ना काही प्रमाणात तडजोड होते. त्याचे परिणाम रुग्णांच्या आरोग्यावर होतात, हे दुर्लक्षित करता येणार नाही. डोंबिवलीतील डॉक्टरांवरील हल्ल्याचा प्रकार एकूणच आरोग्य व्यवस्थांवरचाही हल्ला ठरला. मग तेथे सुरक्षा व्यवस्था नसणे आणि उपचारांसाठी अनेक रुग्णालयांमध्ये पुरेशी साधनसामुग्री नसणे हे यानिमित्ताने अधोरेखित झालेले आहे. अशा प्रकारचे हल्ले होऊ नयेत म्हणून २०१० मध्येच कायदे केले गेले. परंतु त्याचा कोणताही प्रभाव पडलेला नाही. राज्यच नव्हे तर देशभरात कुठे ना कुठे छोट्या-मोठ्या प्रमाणावर डॉक्टरांवर हल्ले होण्याचे प्रकार घडतात. म्हणजेच देशपातळीवरसुद्धा आरोग्य व्यवस्थेच्या सुरक्षेकरिता राष्ट्रीय स्तरावरचे समान धोरण आखण्याची वेळ आलेली आहे. जर या आरोग्य व्यवस्था सर्वार्थाने सक्षम आणि भक्कम झाल्या म्हणजेच डॉक्टर आणि तेथील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबरोबरच सगळ्या व्यवस्था अद्ययावत ठेवल्या गेल्या, तर हल्ले होण्याचे प्रकार नक्कीच कमी होतील. सामाजिक आरोग्याबाबत अनेक वेळेला उदासीनताच दाखविली जाते. खरेतर अन्न, वस्त्र, निवारा या जशा मूलभूत गरजा आहेत तशाच उत्तम आरोग्य व्यवस्था हीसुद्धा मूलभूत गरजच समजली पाहिजे. तरच त्याची गंभीरता लक्षात येईल.

सुदृढ समाजव्यवस्थेसाठी आरोग्य व्यवस्थादेखील तितकीच सुदृढ असणे आवश्यक आहे. संपूर्ण देशात लोकसंख्येच्या तुलनेमध्ये डॉक्टरांची संख्या कमी असणे आणि सरकारी रुग्णालयांमध्ये साधनसामुग्रीची कमतरता असणे आरोग्य व्यवस्थेवर मोठा परिणाम करणारे ठरते. ज्या कारणासाठी आज डॉक्टरांवर आंदोलन करण्याची वेळ येते त्यामध्ये त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि परिणामी रुग्णांवर सन्मानजनक उपचार करण्याचा हेतू तितकाच महत्त्वाचा ठरतो. स्वाभाविकपणे अशा प्रकारे इतक्या महत्त्वाच्या संवेदनशील क्षेत्रात झुंडशाही करून दहशत माजवणाऱ्यांना तातडीने आणि अधिकाधिक कठोर शिक्षेच्या तरतुदी झाल्या पाहिजेत. यासंदर्भातील खटले हेसुद्धा जलदगती न्यायालयांमधून चालवले गेले पाहिजेत. म्हणजेच हल्लेखोरांवर थोडी फार जरब निर्माण होऊ शकेल. अर्थात डॉक्टरांनी थेट आरोग्य सेवा बंद करण्यापूर्वी सरकारकडे आपल्या मागण्यांसाठी पाठपुरावा करायला हवा. कारण अनेक प्रकारच्या उपचारांसाठी रुग्णांना सातत्य ठेवावे लागते. आणि शिवाय काही तातडीच्या उपचारांसाठीसुद्धा सरकारी रुग्णालयात धाव घ्यावी लागते. रुग्णांची कोंडी होणार नाही याची दक्षता अधिक महत्त्वाची ठरते. सरकारने डॉक्टरांबरोबर संवाद साधून विशिष्ट मुदतीमध्ये उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले पाहिजे. हायकोर्टाने देखील डॉक्टरांनी आंदोलन करू नये अशा प्रकारचे आवाहन केले होते. म्हणजेच वैद्यकीय क्षेत्र हे अनेक अर्थाने महत्त्वपूर्ण असल्याने सरकारनेसुद्धा डॉक्टरांच्या सुरक्षिततेचा विषय प्राधान्यक्रमाने विचारात घेऊन योग्य ती उपाययोजना तातडीने केली पाहिजे. म्हणजेच डॉक्टर आणि रुग्णांमध्येसुद्धा विश्वासाचे वातावरण निर्माण होऊ शकेल. सरकारी पातळीवरची उदासीनता किंवा एकूण आरोग्य सेवेकडे होणारे दुर्लक्ष हेसुद्धा वैद्यकीय क्षेत्राची विश्वासार्हता धोक्यात आणणारे ठरतात हेदेखील यानिमित्ताने लक्षात घेतले पाहिजे.

# श्रीक्षेत्र कपिलेश्वर महादेव मंदिरात तापीमाईचा जन्मोत्सव

## ५१ जोडप्यांकडून सामूहिक विशेष पूजाविधी; हजारो भाविकांची उपस्थिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रीक्षेत्र कपिलेश्वर महादेव मंदिर येथे तापीमाईचा जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्यास धुळे, जळगाव जिल्ह्यातील विविध ठिकाणांसह अमळनेर तालुक्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

**मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने फुलला**

तापीमाईंच्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या सामूहिक विशेष पूजाविधीत सुमारे ५१ जोडप्यांनी सहभागी होत तापीमाईस अभिषेक व पूजन केले. यावेळी कपिलेश्वर मंदिराचे मठाधिपती महामंडलेश्वर स्वामी हंसानंद तीर्थजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली महामंडलेश्वर श्री देवेश्वर तीर्थजी महाराज यांनी 'तापी महात्म्य व तापीचा उगम' या विषयावर भावपूर्ण प्रवचन केले. त्यांनी तापी नदीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व उपस्थितांना पटवून दिले. यानंतर विधीवत पूजा करून तापीमाईला साडीचोळीचा आहेर अर्पण केला. आरतीने धार्मिक कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमानंतर सर्व उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती.

या भव्य धार्मिक सोहळ्याचे नियोजन मंदिराचे सचिव मगन वामन पाटील तसेच संपूर्ण विश्वस्त मंडळाने उत्कृष्टरीत्या केले. त्यांच्या नियोजनामुळे कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त केले.



*अमळनेर : श्रीक्षेत्र कपिलेश्वर महादेव मंदिर येथे तापीमाईच्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाप्रसंगी तापीमाईस साडीचोळी अर्पण करीत सामूहिक विशेष पूजाविधी करताना ५१ जोडपी.*

# कार्यालये, महाविद्यालयांना स्व. अजितदादांची प्रतिमा भेट

## अमळनेरमध्ये राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसतर्फे जयंतीनिमित्त राबविला उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार, दि. २१ जुलै रोजी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसतर्फे विविध शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच महाविद्यालयांमध्ये जाऊन स्व. अजितदादांची प्रतिमा फ्रेमसह भेट देण्याचा उपक्रम राबविण्यात आला. राज्य शासनाने सन २०२६ पासून २२ जुलै हा दिवस स्व. अजितदादा पवार यांची जयंती म्हणून सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाच्या या निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित कार्यालयांमध्ये स्व. अजितदादांची प्रतिमा उपलब्ध व्हावी व त्यांची जयंती सन्मानपूर्वक साजरी करता यावी, या उद्देशाने राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे नवनिर्वाचित शहराध्यक्ष मनीष पाटील, तालुकाध्यक्ष प्रणव चौधरी व कार्याध्यक्ष हुजैफा पठाण यांच्या पुढाकारातून हा उपक्रम आयोजित करण्यात आला.



*अमळनेर : राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार, दि. २१ जुलै रोजी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसतर्फे तहसीलदार रूपेशकुमार सुराणा यांना त्यांची प्रतिमा फ्रेमसह भेट देताना माजी शहराध्यक्ष कृष्णा पाटील, राष्ट्रवादी सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष करण साळुंखे, सोशल मीडिया जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानदीप सांगोरे, तालुकाध्यक्ष प्रणव चौधरी, शहराध्यक्ष मनीष पाटील, कार्याध्यक्ष हुजैफा पठाण, सोशल मीडिया शहराध्यक्ष रोहित सूर्यवंशी, राष्ट्रवादी युवक काँग्रेस कोषाध्यक्ष कुशल पाटील, विद्यार्थी सहसचिव चेतन बोरसे, सरचिटणीस तुषार ठाकरे, युवक उपाध्यक्ष वरद कासार, युवक उपाध्यक्ष मोहित शिंदे, युवक चिटणीस विवेक निकम, प्रशांत महाजन, युवक सरचिटणीस अभय महाजन,*

यावेळी पदाधिकाऱ्यांनी स्व. अजितदादांना अभिवादन करून त्यांच्या विचारांचा वारसा युवकांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त केला. या उपक्रमाचे विविध स्तरांतून स्वागत करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष गोविंदा बाविस्कर, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश सचिव सुनील शिंपी, राष्ट्रवादी काँग्रेस सोशल मीडिया विभागाचे जिल्हाध्यक्ष सनी गायकवाड, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष दुर्गेश पाटील, शहर कार्याध्यक्ष भूषण लोहार, उपाध्यक्ष चैतन्य संदानशीव, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष कृष्णा पाटील, राष्ट्रवादी सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष करण साळुंखे, सोशल मीडिया जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानदीप सांगोरे, तालुकाध्यक्ष प्रणव चौधरी, शहराध्यक्ष मनीष पाटील, कार्याध्यक्ष हुजैफा पठाण, सोशल मीडिया शहराध्यक्ष रोहित सूर्यवंशी, राष्ट्रवादी युवक काँग्रेस कोषाध्यक्ष कुशल पाटील, विद्यार्थी सहसचिव चेतन बोरसे, सरचिटणीस तुषार ठाकरे, युवक उपाध्यक्ष वरद कासार, युवक उपाध्यक्ष मोहित शिंदे, युवक चिटणीस विवेक निकम, प्रशांत महाजन, युवक सरचिटणीस अभय महाजन, आदित्य संदानशिव, यश पवार, योगेश पाटील,अनिकेत पाटील, हितेश महाजन, चिन्मय पाटील, उमेश पाटील, भविष्य देशमुख, सुमित मेडिस्कर, प्रशांत चौधरी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# खान अलीझा पठाणचे 'नीट'मध्ये उल्लेखनीय यश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील जपान जीन परिसरातील खान अलीझा रिजवानुर रहमान पठाण हिने राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा 'नीट' (एनईईटी) प्रथम प्रयत्नातच उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश मिळविले. तिने ७२० पैकी ५९५ गुण मिळवीत वैद्यकीय शिक्षणाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे. खान अलीझाने बायोलॉजी, फिजिक्स आणि केमिस्ट्री या तिन्ही विषयांमध्ये ९९ पेक्षा अधिक पर्सेंटाइल मिळवून आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती दिली. यापूर्वी तिने मुंदडा ज्युनिअर कॉलेज, अमळनेर येथून बारावीची परीक्षा ९० टक्क्यांपेक्ष अधिक गुणांसह उत्तीर्ण केली होती. खान अलीझा ही अल-फैज उर्दू गर्ल्स हायस्कूलच्या माजी मुख्याध्यापिका खान अनीसा परवीन यांची पुतणी आहे. तिच्या या यशाबद्दल समाजातील मान्यवर, शिक्षक, नातेवाईक व मित्रपरिवारातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छाही व्यक्त केल्या आहेत.

# महाराष्ट्रातील 'या' पर्यटनस्थळावर होतेय प्रचंड गर्दी

## दूधसागर धबधबे पर्यटकांना खुणावतायत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यात पुन्हा एकदा मॉन्सून सक्रिय झाला असून सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या भंडारदरा परिसराने अक्षरशः हिरवागार साज चढवलाय.गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने दमदार पुनरागमन केल्याने शेंडी, रतनवाडी, घाटघर, हरिश्चंद्रगड आणि कळसूबाई परिसरातील डोंगरदऱ्यांतून असंख्य धबधबे कोसळू लागले आहेत. वसुंधरा, नेकलेस, न्हानी, अंब्रेला आणि रिव्हर्स फॉल पाहण्यासाठी राज्यभरातून पर्यटकांची मोठी गर्दी होत असून भंडारदरा परिसर पुन्हा एकदा पर्यटकांनी फुलून गेला आहे.

गेल्या काही दिवसांच्या विश्रांतीनंतर पावसाने पुन्हा जोरदार हजेरी लावली आणि त्याचा सर्वाधिक परिणाम भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झाल्याचे पाहायला मिळत आहे. शेंडी, रतनवाडी, घाटघर, हरिश्चंद्रगड, कळसूबाई परिसरात निसर्गाने हिरवाईची शाल पांघरली असून डोंगरकड्यांवरून असंख्य धबधबे फेसाळत आहेत. दाट धुके, गार वारे, ढगांमध्ये हरवलेले डोंगर आणि खळखळ वाहणारे ओढे-नाले असा नयनरम्य नजारा अनुभवण्यासाठी पुणे, मुंबई, नाशिकसह राज्याच्या विविध भागांतून पर्यटक मोठ्या संख्येने भंडारदऱ्याकडे धाव घेत आहेत.

**वसुंधरा धबधबा पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू**

धबधब्याखाली चिंब भिजण्याचा आनंद घेत सेल्फी आणि रील्सचीही पर्यटकांमध्ये अक्षरशः स्पर्धा पाहायला मिळत आहे. जवळपास शंभर फूट उंचीवरून कोसळणारा वसुंधरा धबधबा पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. तर नेकलेस फॉल, न्हानी फॉल,अंब्रेला फॉल आणि रिव्हर्स फॉलही पर्यटकांना अक्षरशः मोहून टाकत आहेत. विशेष म्हणजे अंब्रेला फॉल हा विल्सन धरणाच्या पाण्याच्या विसर्गानंतर तयार होणारा हंगामी धबधबा असून जुलै ते ऑक्टोबर या काळातच त्याचे मनमोहक रूप पाहायला मिळते.

**भंडारदरा परिसरात वाहनांच्या लागल्या रांगा**

अहिल्यानगर जिल्ह्याची जीवनदायिनी मानल्या जाणाऱ्या भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसामुळे पाण्याची आवक वाढू लागली असून परिसरातील नद्या, ओढे आणि धबधबे पुन्हा जीवंत झाले आहेत. विकेंड असल्याने भंडारदरा परिसरात वाहनांच्या रांगा लागल्या असून स्थानिक पर्यटन व्यवसायालाही याचा मोठा फायदा होत आहे. मात्र, प्रशासनाने पर्यटकांना धबधब्याच्या पाण्यात खोलवर न उतरण्याचे, सुरक्षित अंतर राखण्याचे आणि सेल्फीच्या नादात जीव धोक्यात न घालण्याचे आवाहन केले आहे. कारण डोंगराळ भागात पावसाचा जोर अचानक वाढल्यास पाण्याचा प्रवाहही क्षणार्धात वाढू शकतो. एकीकडे पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळत असतानाच दुसरीकडे भंडारदरा परिसर पुन्हा एकदा निसर्गप्रेमी आणि पर्यटकांनी गजबजून गेला आहे. पुढील काही दिवस मॉन्सून अधिक सक्रिय राहण्याचा अंदाज असल्याने या परिसरातील धबधब्यांचे सौंदर्य आणखी खुलण्याची शक्यता आहे.

# पंढरपूरला जाणाऱ्या पालखी मार्गावरील गावांची नावे आहेत अत्यंत अर्थपूर्ण

## काय आहे या गावांचे महत्त्व? सविस्तर माहिती जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी आषाढी व कार्तिकी या एकादशींवेळी पंढरपूर येथे पाली जाते. ही पालखी ज्या गावांवरून पंढरपूरला जाते त्या गावांची नावे अत्यंत अर्थपूर्ण आहेत. काय आहे या गावांचे महत्त्व? ते आपण जाणून घेऊ.

**१) आळंदी :** पालखी आळंदीतून (वद्य ।। ९ ।।) निघते. आळंदी म्हणजे आत्मानंद. पालखीचा प्रारंभ आत्मानंदातून होतो.

**२) पुणे :** पालखी पुण्यात येते. पालखीबरोबर निघालो की जन्मजन्मांतरीची पापे नष्ट होऊन पुण्य प्राप्ती होते. (भवानी पेठ, बुरडाच्या पुलाकडील पालखी विठोबा मंदिर, पुणे या ठिकाणी पालखीचा दोन दिवस मुक्काम असतो.)

**३) दिवेघाट :** नंतर पालखी संवत्सर ग्राम ऊर्फ सासवड या क्षेत्राकडे निघते. सासवडला जाताना दिवे घाटातून म्हणजे यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी या अष्टांगयोगाच्या आचार दिव्यातून जावे लागते.

**४) सासवड :** वड म्हणजे सप्तचक्र. मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, आज्ञा व शून्यचक्र या सप्तचक्रांची जागृती ही जीवनाची गरज आहे व ती जागृती प्राणायामाने होते. प्राणायाम म्हणजे श्वासावर नियंत्रण, श्वासावर ताबा म्हणजे सासवडचा मुक्काम व परमार्थाचा मार्ग सोपान होऊन सोपानदेवांच्या समाधीचे दर्शन घ्यावे.

**५) जेजुरी :** नंतर पालखी जेजुरीला येते. ज = जितेंद्र, जोरी = जास्त त्रास न घेणे. म्हणजेच जो जास्त त्रास न घेता इंद्रियांना जिंकतो तो आनंदी होतो.



**६) वाल्ह्या :** भर दुपारी वाल्ह्यात येते. येथे दुपारचा मुक्काम असतो. भर तारुण्यात माणसाने वाल्हे= कोमल, प्रेमळ, जिव्हाळासंपन्न झाले पाहिजे. (वाल्ह्यात वाल्मिकी ऋषींच्या समाधीचे दर्शन होते.)

**७) लोणंद :** त्यानंतर पालखी लोणंदला मुक्कामाला येते. लो = देणे, आनंद = परमसुख. श्रीविठ्ठल भक्तीसाठी घरदार सोडून आलेला वारकरी भक्तिरसाने परमानंदी होतो व तो आनंद इतरांना देतो.

**८) तरडगाव :** जर तू ब्रम्हानंदाचा आनंद घेतला नाहीस तर तुला जीवनात रडावे लागेल या सिध्दांताचे चिंतन करण्यासाठी पालखी तर + रड =तरडगावला येते.

**९) फलटण :** ब्रम्हसत्यं जगन्मिथ्या। म्हणजे ब्रम्ह हे पूर्ण सत्य आहे बाकी सारे जग फोलपटासारखे मिथ्या म्हणजे टाकाऊ आहे. हा अनुभव वारकऱ्यांना फलटणला आल्यावर येतो. हे जीवनाचे सत्य समजल्यावर

**१०) बरड :** संसारातील सुख-दुःखादि द्वद्वापासून मुक्त होतो. त्याचे जीवनरूपी क्षेत्र वासनेचे तृणांकूर न फुटणारे बरड जमिनीसारखे होते.

**११) नातेपुते :** नातेपुते या गावी इतर नात्यांच्या मोहातून मुक्त होऊन तो फक्त श्रीविठ्ठलाचा होतो.

**१२) माळशिरस :** माळ = साखळी + शिरस = ज्ञान = माळशिरस. पायी चालल्याने शारीरिक मुखाने नामस्मरण केल्याने वाचिक विठ्ठलध्यासाने मानसिक तपाबरोबर कीर्तन - प्रवचनाच्या श्रवणाने ज्ञानाची साखळी त्याला विठ्ठलरूप करते.

**१३) वेळापूर :** त्यानंतर त्यांचा मुक्काम वेळापुरात होतो. क्षणभर सुद्धा वेळ वाया न घालविता विठ्ठल भजन केले पाहिजे, हे ज्ञान होते.

**१४) वाखरी :** वाखरीच्या मुक्कामी त्याची वाणी प्रासादिक व वाचा सिद्ध होऊन जाते.

१५) नंतर तो पंढरपूरला जाऊन पांडुरंगमय होतो.

**। पांडुरंग... पांडुरंग, विठ्ठल... विठ्ठल ।।**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# जेईई में रैंक ४५, बीटेक में फेल, फिर यूपीएससी में एआयआर नं. वन

## आईपीएस से आईएएस बन गए गौरव अग्रवाल

सक्सेस स्टोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

राजस्थान के जयपुर के रहने वाले आईएएस गौरव अग्रवाल की कहानी गजब मोटिवेशनल है। देश के लाखों युवा एक बार परीक्षा में फेल होने पर दिल छोटा कर लेते हैं। लेकिन गौरव अग्रवाल की कहानी सिखाती है कि जिंदगी में लगे झटके दरअसल बड़ी छलांग लगाने के लिए तैयार करते हैं। वे देश के उन गिने-चुने युवाओं में से हैं जिन्होंने ३ सबसे मुश्किल परीक्षाओं- जेईई, कैट और यूपीएससी में कामयाबी का परचम लहराया है।

साल २०१३ की सिविल सेवा परीक्षा में एआयआर १ हासिल करने वाले गौरव अग्रवाल का सफर किसी फिल्मी स्क्रिप्ट से कम नहीं है। सिर्फ १६ साल की उम्र में आईआईटी-जेईई जैसी कठिन परीक्षा पास करने वाले गौरव बीटेक में कई विषयों में फेल हो गए थे। इससे उनका एक साल बर्बाद हो गया। लेकिन इस नाकामी से टूटने के बजाय उन्होंने इसे अपनी ताकत बनाया। इसके बाद उन्होंने जो स्पीड पकड़ी, उसने उन्हें हांगकांग की हाई पेइंग जॉब से लेकर आईपीएस-आईएएस जैसे पदों तक पहुंचा दिया।

### जेईई में रैंक ४५, आईआईटी में भटक गया फोकस

पिंक सिटी जयपुर में पले-बढ़े गौरव अग्रवाल बचपन से ही पढ़ाई में अव्वल थे। साल २००१ की जेईई परीक्षा में उन्होंने देशभर में ४५वीं रैंक हासिल की थी। उन्हें आईआईटी कानपुर में कंप्यूटर साइंस जैसी प्रतिष्ठित स्ट्रीम मिली। लेकिन कॉलेज कैंपस की चकाचौंध में उनका ध्यान थोड़ा भटक गया। नतीजा यह हुआ कि वे बीटेक के कुछ विषय क्लियर नहीं कर पाए। उन्हें बैक पेपर देना पड़ा। इससे उनकी डिग्री १ साल लेट हो गई। गौरव खुद मानते हैं कि इस झटके ने उन्हें जमीन पर ला दिया और उनके अंदर अनुशासन और विनम्रता भर दी।




### आयआयएम का गोल्ड मेडल और हांगकांग की लग्जरी नौकरी

इंजीनियरिंग के कड़वे अनुभव से सीख लेकर गौरव अग्रवाल ने दोबारा अपनी पढ़ाई पर फोकस किया। साल २००५ में कैट परीक्षा में ९९.९४ परसेंटाइल स्कोर करके सबको चौंका दिया। उन्हें आईआईएम लखनऊ में एडमिशन मिला, जहां से वे फाइनेंस में गोल्ड मेडल लेकर पासआउट हुए। इस शानदार प्रोफाइल के दम पर उन्हें हांगकांग में बतौर इन्वेस्टमेंट बैंकर काम करने का मौका मिला। वे विदेश में बेहद स्टेबल और आलीशान जिंदगी जी रहे थे, लेकिन उनका दिल हमेशा देश की सेवा करने के लिए धड़कता था।

### विदेश का रुतबा छोड़ लौट आए भारत

तकरीबन ३ साल तक हांगकांग में नौकरी के बाद गौरव ने एक बड़ा फैसला लिया। हाई-प्रोफाइल नौकरी को लात मारकर वह यूपीएससी की तैयारी के लिए भारत लौट आए। मेहनत रंग लाई और पहले ही प्रयास में उन्होंने २४४वीं रैंक हासिल की। उन्हें भारतीय पुलिस सेवा (आयपीएस) मिली। हैदराबाद की नेशनल पुलिस एकेडमी में खाकी वर्दी की ट्रेनिंग भी शुरू हो गई, लेकिन उनका अंतिम लक्ष्य आईएएस अफसर बनना था। इसलिए उन्होंने ट्रेनिंग के कठिन शेड्यूल के बीच भी हार नहीं मानी और दोबारा परीक्षा देने की ठानी।

### शादी के ९वें दिन आया रिजल्ट और बन गए यूपीएससी टॉपर

साल २०१३ में गौरव अग्रवाल ने यूपीएससी परीक्षा का दूसरा प्रयास दिया। इस बीच उनकी शादी डॉ. प्रीति से हो चुकी थी। उन्होंने निम्स मेडिकल कॉलेज से पीजी किया है। शादी को सिर्फ ९ दिन ही हुए थे कि यूपीएससी का फाइनल रिजल्ट आ गया। गौरव ने अपनी पत्नी को फोन मिलाकर कहा- ओ यार प्रीति, मैंने तो टॉप कर दिया! यह सिर्फ उनके लिए नहीं, बल्कि पूरे परिवार के लिए बेहद भावुक पल था। देश में पहली रैंक पाकर वे राजस्थान कैडर के आईएएस अधिकारी बने।

आईएएस गौरव अग्रवाल (आयएएस २०१४) अभी राजस्थान के उदयपुर में कलेक्टर और जिला मजिस्ट्रेट के पद पर तैनात हैं। वह भारतीय अर्थव्यवस्था पर किताब भी लिख चुके हैं।

# रक्त, किंकाळ्या आणि रहस्य... भारतातील 'हा' रहस्यमय किल्ला

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारत आपल्या रहस्यमय किल्ल्यांसाठी, प्राचीन मंदिरांसाठी आणि न सांगितलेल्या कथांसाठी जगभरात प्रसिद्ध आहे. येथे अशी अनेक ऐतिहासिक स्थळे आहेत, ज्यांच्या कथा आजही लोकांना चकित करतात.

### रोहतासगड किल्ला

असेच एक स्थळ म्हणजे बिहारच्या रोहतास जिल्ह्यात असलेला रोहतासगड किल्ला. जो भारतातील सर्वात प्राचीन आणि रहस्यमय किल्ल्यांपैकी एक मानला जातो.

### इतिहास

हा किल्ला त्याच्या भव्यतेसाठी आणि इतिहासासाठी ओळखला जातो, पण त्याच्याशी निगडित भयानक कथांमुळेही तो चर्चेत असतो.

### किल्ल्याचा इतिहास

असे म्हटले जाते, की एकेकाळी या किल्ल्याच्या भिंतींमधून रक्त ठिबकत असे. रात्रीच्या वेळी किंकाळ्या आणि आक्रोश ऐकू येत असत. रोहतासगड किल्ल्याचा इतिहास अतिशय प्राचीन आणि मनोरंजक मानला जातो. असे म्हटले जाते, की एकेकाळी या किल्ल्याच्या भिंतींमधून रक्त ठिबकत असे. रात्रीच्या वेळी किंकाळ्या आणि आक्रोश ऐकू येत असत. रोहतासगड किल्ल्याचा इतिहास अतिशय प्राचीन आणि मनोरंजक मानला जातो.

### राजा त्रिशंकू

अयोध्येचे सूर्यवंशी राजा त्रिशंकू यांचा नातू आणि राजा हरिश्चंद्र यांचा मुलगा असलेल्या रोहिताश्वने त्रेता युगात हा किल्ला बांधला. म्हणूनच या किल्ल्याला रोहतासगड असे नाव पडले.

### सामर्थ्याचे प्रतीक

पर्वतांमध्ये उंच ठिकाणी बांधलेला हा भव्य किल्ला त्याच्या मजबुती आणि भव्य वास्तुकलेसाठी प्रसिद्ध आहे. बिहारच्या सोन खोऱ्याच्या सौंदर्याचे आणि सामर्थ्याचे प्रतीक मानला जातो.

### ऐतिहासिक वास्तू

सुमारे २,००० फूट उंचीवर वसलेल्या या किल्ल्यावरून सभोवतालच्या परिसराचे विस्मयकारक दृश्य दिसते. किल्ल्याच्या आत अनेक प्राचीन दरवाजे, मंदिरे, राजवाडे आणि ऐतिहासिक वास्तू आहेत.

### हिंदू शासक

जे पर्यटकांना आकर्षित करतात. कैमूर टेकड्यांमध्ये उगम पावणारे आणि सोन नदीला मिळणारे धबधबे देखील प्रसिद्ध आहेत. इतिहासकारांच्या मते रोहतासगड किल्ल्यावर दीर्घकाळ हिंदू शासकांचे राज्य होते.

### बंडाचे नेतृत्व

१६ व्या शतकात मुघलांनी तो ताब्यात घेतला आणि अनेक वर्षे राज्य केले. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धादरम्यान, बाबू कुंवर सिंग यांचा भाऊ अमर सिंग याने याच किल्ल्यावरून ब्रिटिशांविरुद्ध बंडाचे नेतृत्व केले होते.

### रक्त ठिबकण्याची कहाणी

त्यामुळे, भारतीय इतिहासात या किल्ल्याला एक महत्त्वपूर्ण स्थान आहे. रोहतासगड किल्ल्याशी संबंधित सर्वात रहस्यमय गोष्टींपैकी एक म्हणजे त्याच्या भिंतींमधून रक्त ठिबकण्याची कहाणी.

### फ्रेंच इतिहासकार


स्थानिकांच्या मते, अनेक वर्षांपूर्वी किल्ल्याच्या दगडी भिंतींमधून एक लाल द्रव पाझरत असे, ज्याला लोक रक्त मानत होते. सुमारे २०० वर्षांपूर्वी, फ्रेंच इतिहासकार बुकानन यांनी त्यांच्या भेटीदरम्यान या घटनेची नोंद केली.

### पदार्थ

त्यांनी लिहिले की किल्ल्याच्या भिंतींमधून रक्तासारखा पदार्थ पाझरताना दिसत होता. स्थानिकांचा दावा आहे की रात्रीच्या वेळी किल्ल्यातून रडण्याचे आणि किंचाळण्याचे आवाज ऐकू येत असत.

### अंधार

यामुळेच बऱ्याच काळापासून लोक अंधार पडल्यानंतर किल्ल्याजवळ जाण्यास घाबरत होते. जरी याला कोणताही वैज्ञानिक दुजोरा मिळालेला नसला तरी ही कहाणी आजही लोकांमध्ये गूढ आणि भीतीचा विषय बनून राहिली आहे.



# १८ लाख वर्षांपूर्वीच मानवाने केला होता अग्नीचा वापर

## दक्षिण आफ्रिकेत सापडले पुरावे; मानवी उत्क्रांतीच्या इतिहासाला कलाटणी देणारा शोध

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

मानवी उत्क्रांतीच्या इतिहासाला कलाटणी देणारा एक महत्त्वपूर्ण शोध दक्षिण आफ्रिकेत लागला आहे. आफ्रिकेतील 'वंडरवर्क गुहेत' शास्त्रज्ञांना १८ लाख वर्षांपूर्वीचे जळालेले हाडांचे अवशेष सापडले आहेत. या शोधामुळे मानवाने अग्नीचा (आगीचा) वापर सुरू केल्याचा काळ आता थेट दुप्पट मागे गेला आहे. यापूर्वी मानवाद्वारे अग्नीच्या वापराचे सर्वात जुने पुरावे सुमारे १० लाख वर्षांपूर्वीचे मानले जात होते.



### 'होमो इरेक्टस्' आणि अग्नीचे नाते

'प्लॉस वन' या प्रसिद्ध नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार, हा पराक्रम आधुनिक मानवाचे (होमो सेपियन्स) पूर्वज असलेल्या 'होमो इरेक्टस' या प्रजातीने केला होता. शास्त्रज्ञांच्या मते या आदिमानवांना स्वतःहून आग निर्माण करण्याची कला (उदा.- दगड घासून आग लावणे) अवगत नसावी. मात्र, जंगलातील नैसर्गिक वणव्यांपासून लागलेली आग त्यांनी गुहेत आणली असावी आणि ती सातत्याने पेटती ठेवली असावी.

### शोध लागला कसा?

जेरुसलेमच्या हिब्रू युनिव्हर्सिटीच्या प्राध्यापिका लिओरा हॉर्विट्झ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी यासाठी एका नव्या आणि स्वस्त 'ल्युमिनेसेन्स' तंत्रज्ञानाचा वापर करून हे संशोधन केले. या पद्धतीत हाडांच्या तुकड्यांवर विशिष्ट रंगाचा निळा प्रकाश टाकला जातो. जळालेली हाडे या प्रकाशात चमकतात, तर न जळालेली हाडे अंधारात राहतात. गुहेत आढळलेले हे अवशेष घुबडांनी शिकार केलेल्या उंदरांचे आहेत. विशेष म्हणजे, हे जळालेले अवशेष गुहेच्या प्रवेशद्वारापासून तब्बल १०० फूट आत सापडले आहेत. एवढ्या खोलवर जंगलातील वणव्याची आग पोहोचणे अशक्य असल्याने, आदिमानवानेच ती जाणीवपूर्वक आत आणली असल्याच्या निष्कर्षाला बळकटी मिळते. पॅलिओअँथ्रोपोलॉजिस्ट मायकेल चाझान यांनी सांगितले, की आम्हाला अग्नीच्या अस्तित्वाचे अनेक पुरावे मिळत आहेत. आता प्रश्न असा आहे की ते या आगीचा वापर कशासाठी करत होते?

काही शास्त्रज्ञांच्या मते आदिमानव गुहेतील सुकलेले पालापाचोळा किंवा प्राण्यांची विष्ठा ही आग पेटती ठेवण्यासाठी इंधन म्हणून वापरत असावेत. काही तज्ज्ञांनी यावर शंका उपस्थित केली असली, तरी हा शोध मानवी संस्कृतीच्या पायावर नवीन प्रकाश टाकणारा ठरला आहे.

# पावसाळ्यात गवती चहा का प्यावा? जाणून घ्या आरोग्यदायी फायदे

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

गवती चहा हा चविष्ट, कमी कॅलरीचा आणि अनेक संभाव्य आरोग्यदायी गुणधर्म असलेला हर्बल चहा आहे. गवती चहा (लेमनग्रास) ही एक सुगंधी औषधी वनस्पती आहे. पावसाळ्यात दमट हवेमुळे आजारपण वाढीस लागते. अशा वेळी गवती चहा प्यायल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढते. पानांपासून बनवलेला चहा आरोग्यादायी मानला जातो. गवती चहामध्ये शरीरातील पेशींना हानी पोहोचविणाऱ्या मुक्त रॅडिकल्सचा प्रभाव कमी करण्यास मदत करणारी अँटिऑक्सिडंट संयुगे असतात. गवती चहा पचनास मदत करतो. अपचन, पोट फुगणे, गॅस आणि जडपणा यासारख्या त्रासात आराम मिळू शकतो. सर्दी-खोकल्यात आराम मिळून गरम गवती चहा घशाला आराम देऊ शकतो. त्याचा सुगंध नाक मोकळे करण्यास मदत करू शकतो. गवती चहातील काही नैसर्गिक घटकांमध्ये दाह कमी करण्याचे गुणधर्म असतात.

सांधेदुखी किंवा स्नायूंच्या किरकोळ वेदनांमध्ये काही प्रमाणात गवती चहाचा फायदा होऊ शकतो. त्याचा ताजेतवाने सुगंध आणि गरम पेयामुळे आराम आणि शांतता जाणवते. तणाव कमी करण्यास मदत करतो. गवती चहा हे एक नैसर्गिक डिटॉक्स पेय आहे. जे शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास मदत करते. पावसाळ्याच्या दिवसांत गवती चहाचा हर्बल काढाही तयार करतात.



# केळी खाल्ल्यानंतर लगेच पाणी का पिऊ नये?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

केळी खाल्ल्यानंतर लगेच पाणी प्यायचे की नाही? हा गोंधळ निर्माण करणारा प्रश्न अनेकांना पडतो. याविषयी आज आपण जाणून घेणार आहोत.

### सुपरफूड

केळी सहज उपलब्ध, स्वस्त आणि वर्षभर मिळणारे फळ आहे. डॉक्टर देखील दररोज एक केळी खाण्याची शिफारस करतात.

### भरपूर पोषक तत्त्वे

कॅलरीज, प्रथिने, फायबर, पोटॅशियम, मॅग्नेशियम, तांबे, जीवनसत्त्वे ए, बी६, सी यांसारखे अनेक पोषक घटक केळीत असतात.

### अनेकांची मोठी चूक

केळी खाल्ल्यावर लगेच पाणी पिणारी सवय बऱ्याच लोकांमध्ये आहे. पण ही सवय आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.

### दुष्परिणाम

केळीतील उच्च पोटॅशियम पाण्यासोबत मिसळल्याने पचनक्रिया बिघडते.



पोटातील आम्लता वाढते.

### उद्भवणाऱ्या समस्या

ॲसिडिटी, पोट फुगणे, गॅस, पोटदुखी आणि इतर पचनाच्या समस्या निर्माण होऊ शकतात.

### योग्य वेळ कधी?

केळी खाल्ल्यानंतर किमान अर्धा तास वाट पाहा. मग पाणी प्या, जेणेकरून सर्व पोषक तत्त्वे शरीर पूर्णपणे शोषून घेईल.

### केळी कशी खावी?

नाश्त्यात दही, दूध किंवा उच्च-चरबीयुक्त पदार्थांसोबत केळे खा. हे कॉम्बिनेशन आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे.

### अतिरिक्त फायदे

केळीतील पोटॅशियममुळे तणाव कमी होतो. कॅल्शियममुळे हाडे मजबूत होतात तर 'अ' आणि 'क' जीवनसत्वांमुळे त्वचा निरोगी राहण्यास मदत होते.


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे. सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# भादली, भडरिया तथा कंदर्प नवमी म्हणजे काय?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भादली, भडरिया तथा कंदर्प नवमी हा हिंदू दिनदर्शिकेनुसार आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षाच्या नवमीला येणारा अत्यंत पवित्र दिवस आहे. या दिवसाला 'अबूझ मुहूर्त' (स्वयंसिद्ध शुभ मुहूर्त) मानले जाते. याचा अर्थ असा, की कोणतेही शुभ कार्य (उदा.-विवाह, गृहप्रवेश, साखरपुडा किंवा नवीन व्यवसाय) करण्यासाठी पंचांग पाहण्याची किंवा ज्योतिषाचा सल्ला घेण्याची गरज भासत नाही. हिंदू धर्मात या दिवसाला अत्यंत धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. अक्षय्य तृतीया आणि देवोत्थान एकादशीप्रमाणेच या दिवसाला महत्त्व आहे, की या दिवशी दिवसभर ग्रह-नक्षत्रांची स्थिती इतकी अनुकूल असते की कोणत्याही शुभ कार्यासाठी कोणत्याही पंडिताला विचारण्याची गरज राहत नाही.




### यंदाची अर्थात २०२६ ची भादली नवमी कधी?

वैदिक पंचांगानुसार यंदाच्या अर्थात २०२६ च्या तिथी, वेळा खालीलप्रमाणे आहेत.

**नवमी तिथीची सुरूवात :** २२ जुलै २०२६ रोजी पहाटे ०५:१६ वाजता होईल.

**नवमी तिथीची समाप्ती :** २३ जुलै २०२६ रोजी सकाळी ०७:०३ वाजता होईल.

'उदयतिथी'च्या नियमांनुसार २२ जुलै २०२६ रोजी सूर्योदयावेळी नवमी तिथी विद्यमान आहे. त्यामुळे भादली नवमीचा मुख्य उत्सव आणि पूजा याच दिवशी साजरी केली जाईल. परंतु काही ठिकाणी हा उत्सव २३ जुलै २०२६ रोजीही साजरा करण्यासाठी पूजाविधी होईल.

### भादली नवमी २०२६ चे धार्मिक महत्त्व

भादली नवमीबरोबर दोन दिवसांनंतर 'देवशयनी एकादशी' येते, ज्यापासून 'चातुर्मासा'ची (चार महिन्यांचा पवित्र काळ) सुरूवात होते. असे मानले जाते, की देवशयनी एकादशीला भगवान विष्णू चार महिन्यांसाठी योगनिद्रेत (दिव्य निद्रेत) जातात. धार्मिक ग्रंथांनुसार या काळात ईश्वराचा थेट आशीर्वाद उपलब्ध नसतो असे मानले जाते. त्यामुळे विवाह, मुंडन, उपनयन (जानवे धारण करण्याचा विधी) किंवा गृहप्रवेश यांसारखे शुभ समारंभ या काळात केले जात नाहीत. परिणामी विवाह आणि इतर शुभ कार्यांसाठीचा या हंगामातील शेवटचा दिवस म्हणून 'भादली नवमी' मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. तसेच यानंतरच्या चार महिन्यांसाठी भगवान विष्णू विश्रांती घेतात (योगनिद्रेत जातात). त्यामुळे या दिवशी भक्त भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मी यांची विशेष पूजा-अर्चना करतात. लोक उपवास करतात, मंदिरात जातात आणि आगामी चार महिन्यांसाठी दैवी संरक्षण व आशीर्वादाची प्रार्थना करतात.

### भादली नवमीचा पूजाविधी कसा केला जातो?

सकाळ लवकर उठून स्नान करावे. पूजेचा संकल्प करून घरातील देव्हाऱ्यात गणपती बाप्पांना पंचामृताने स्नान घालून नवीन वस्त्रे, फुले आणि दुर्वा अर्पण कराव्यात. तांब्याच्या भांड्याने शिवलिंगावर जल अर्पण करावे. पती-पत्नीने एकत्र येऊन शिव-पार्वती यांची पूजा केल्यास वैवाहिक जीवनात सुख-शांती राहते. शिवलिंगावर बेलपत्र, चंदन, आणि फुले वाहून 'ओम नमः शिवाय' या मंत्राचा जप करावा. हा गुप्त नवरात्रीचा शेवटचा दिवस असल्यामुळे देवी दुर्गेला लाल चुनरी आणि शृंगाराचे साहित्य अर्पण करावे. लहान कन्यांना सात्विक भोजन (उदा.- पुरी, हलवा) देऊन त्यांचा सन्मान करावा आणि त्यांना दक्षिणा द्यावी. या दिवशी केलेले दान-पुण्य अक्षय मानले जाते.



# श्री स्वामी समर्थांचे समकालीन भक्त 'बाळाप्पा'

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

बाळाप्पा हे हवेरी (करजगी, जि. धारवाड) येथील राहणारे. श्रीमंत सावकारी -सराफी घराण्यात जन्मलेले. तिसाव्या वर्षीच सद्गुरू प्राप्तीची तळमळ लागली. आपल्या मुलीचा विवाह व मुलाचा उपनयन संस्कार लवकर केला आणि घराचा त्याग करून ते सद्गुरूंच्या शोधार्थ बाहेर पडले. मुरगोडला (जि. धारवाड) आल्यावर शिव अवतारी महापुरुष श्री चिदंबर दीक्षित यांच्याकडे तीन दिवस राहून त्यांनी गाणगापुरास प्रयाण केले. तेथे दोन महिने खडतर तपश्चर्या केली.

एके दिवशी त्यांच्या स्वप्नात ब्राह्मण येऊन म्हणू लागला, की तुम्ही अक्कलकोटी जाऊन श्री स्वामी समर्थांची सेवा करावी. जागे होऊन पाहतात तो त्यांना अंथरुणावर एक चिठ्ठी दिसली. 'इतक्यात उतावीळ करू नये', असा चिठ्ठीत मजकूर होता. त्यामुळे त्यांनी परत दोन महिने गाणगापुरात अनुष्ठान पूर्ण केले. त्यावेळी त्यांना श्री स्वामी समर्थांचा दृष्टांत झाला. बाळाप्पा हे एक दिवस संगमावर स्नानासाठी गेले असता औदुंबरक्षाखाली एक लाल विंचू दिसला. त्याला न मारता आपल्या अनुष्ठान पूर्ण करून गावात भिक्षांना मागण्यास गेले असता त्या दिवशी पक्वान्न मिळाले. तो दिवस शुभ समजून त्यांनी अक्कलकोटास प्रयाण केले. श्रीराम नवमीचे पारण्यास अक्कलकोटी आले. श्री स्वामी समर्थ त्यावेळी खास बागेत होते. तिथे जाऊन बाळाप्पा ने बरोबर आणलेली खडीसाखर श्री समर्थांपुढे ठेवून नमस्कार केला. आपण स्वप्नात पाहिलेल्या मूर्ती प्रमाणे श्री समर्थांचे दर्शन होतात त्यांचा आनंद गगनात मावेना असा झाला. त्याप्रमाणेच श्रींनाही आनंद होऊन प्रत्येक वृक्षाला अलिंगन देऊन, मिठी मारून बाळाप्पा वरील प्रेम त्यांनी व्यक्त केले.

श्री स्वामी समर्थ बाळाप्पांवर फार माया करीत. त्यामुळे इतर सेवेकऱ्यांमध्ये अधून मधून खटके उडत. बाप्पांच्या हे लक्षात येताच आपण महाराजांच्या परवानगीने येथून जावे असे त्यांना वाटले. परंतु अंतरसाक्षी श्री समर्थांनी जाऊ दिले नाही. गावाबाहेर श्री मारुती मंदिरात अनुष्ठान करण्यास सांगितले. त्याप्रमाणे बाळाप्पा नित्यसेवा करून दर्शन घेत असत. श्री स्वामी समर्थांच्या निर्यानानंतर बाळाप्पा फारच कष्टी झाले. श्री समर्थांचा विरह फारच जाणवू लागला. एके दिवशी श्री समर्थ आपल्यापुढे उभे आहेत याचा अत्यानंद होऊन त्यांनी साष्टांग प्रणिपात केला. त्यावेळी बाळांना श्री समर्थ म्हणाले, की मी तुला ज्या पादुका दिल्या आहेत तेथे मी प्रत्यक्ष वास करीत आहे, तेथेच माझे प्राण आहेत. यापुढे तेथेच मी तुझी सेवा घेईल. पुर्वी प्रमाणेच माझी सेवा सुश्रुषा करीत जा.


बाळाप्पा यांना श्री समर्थांनी पादुका दिलेल्या होत्या त्यांचीच बाळाप्पांनी स्थापना करून अखंड सेवा सुरू केली. व असंख्य भक्तांना मार्गदर्शन करून श्री समर्थांचे कार्य खऱ्या अर्थाने करण्याचा मान मिळविला. पुढे त्यांनी मिती फा.शु.॥ ४ मंगळवार दिनांक १५ मार्च १९१०रोजी सकाळी ७:१५ मि. आपल्या पार्थिव देहाचा त्याग केला. त्यानंतर बाळाप्पांचे शिष्य श्री गंगाधर महाराजांनी ती गादी चालविली.

# गुरुपौर्णिमा २८ की २९ जुलैला?

## जाणून घ्या अचूक तारीख आणि दुर्मिळ योगांचे महत्त्व!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतीय संस्कृती आणि परंपरेमध्ये आई-वडिलांनंतर सर्वोच्च आदराचे व श्रद्धेचे स्थान जर कोणाला दिले असेल, तर ते गुरूंना. 'आचार्य देवो भव' या श्लोकाप्रमाणे आपल्या जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या, अंधकारातून प्रकाशाकडे नेणाऱ्या आणि उत्तम संस्कारांची शिदोरी देणाऱ्या गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा पवित्र दिवस म्हणजेच गुरुपौर्णिमा. दरवर्षी आषाढ पौर्णिमेच्या दिवशी हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यंदा २०२६ मध्ये मात्र ही पौर्णिमा दोन




वेगवेगळ्या दिवसांत विभागली गेल्यामुळे भाविकांच्या आणि अभ्यासकांच्या मनात हा सण नेमका कधी साजरा करायचा, याबाबत मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

हिंदू पंचांग आणि वेळेच्या अचूक गणितानुसार आषाढ पौर्णिमा तिथीची सुरूवात मंगळवार, २८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजून २१ मिनिटांनी होणार आहे. तर या तिथीची सांगता दुसऱ्या दिवशी, म्हणजेच बुधवार, २९ जुलै २०२६ रोजी रात्री ८ वाजून ७ मिनिटांनी होईल. आपल्या धर्मशास्त्रानुसार कोणतेही सण किंवा व्रत साजरे करताना उदयतिथी (म्हणजेच सूर्योदयाच्या वेळची तिथी) हीच ग्राह्य धरली जाते. याच नियमानुसार बुधवारी सूर्योदयावेळी पौर्णिमा असल्याने यंदाची गुरुपौर्णिमा बुधवार, २९ जुलै २०२६ रोजी साजरी करणेच सर्वाधिक योग्य आणि शास्त्रसंमत ठरेल.

यंदाच्या या गुरुपौर्णिमेचे आणखी एक विशेष आणि अत्यंत दुर्मिळ महत्त्व म्हणजे या दिवशी जुळून आलेले दोन अतिशय शुभ योग. ज्योतिषशास्त्रीय दृष्टिकोनातून या दिवशी प्रीती योग आणि हर्षण योग असे दोन योग दिवसभर असणार आहेत. प्रीती योग हा माणसांमधील परस्पर सुसंवाद, अथांग प्रेम आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रमुख प्रतीक मानला जातो, ज्यामुळे नात्यांमधील सर्व कटुता आणि दुरावा संपुष्टात येतो. दुसरीकडे, हर्षण योग हा माणसाच्या आयुष्यात अपार यश, अमाप उत्साह आणि आनंदाची उधळण करतो. या दुर्मिळ मुहूर्तांवर मनोभावे गुरुपूजन केल्यास आयुष्यात सुख, शांती आणि प्रगतीचे नवे मार्ग प्रशस्त होतात, अशी भाविकांची दृढ श्रद्धा आहे.

पूजा आणि नामस्मरणासाठी तीन अतिशय विशेष मुहूर्त देण्यात आले आहेत. पहाटे ४:१७ ते ४:५९ या वेळेत असलेला ब्रह्म मुहूर्त हा प्रामुख्याने साधना, सखोल चिंतन आणि श्री दत्तगुरू, स्वामी समर्थ किंवा आपल्या आराध्य गुरूंच्या नामस्मरणासाठी सर्वोत्तम मानला गेला आहे. तसेच दुपारी २:४३ ते ३:३७ या विजय मुहूर्तावर गुरूंच्या मार्गदर्शनाने आणि आशीर्वादाने कोणत्याही नवीन कार्याचा श्रीगणेशा करणे अत्यंत फलदायी ठरेल. तर सायंकाळी ७:१४ ते रात्री ८:१७ या शुभ वेळेत आपल्या जीवनातील शिक्षकरूपी गुरूंची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याविषयी आदर व कृतज्ञता व्यक्त करणे उचित राहील.

आध्यात्मिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या विचार केल्यास या मंगलमय दिवसाला व्यास पौर्णिमा असेही गौरवाने संबोधले जाते. मानवी कल्याणासाठी महाभारतासारखा महान ग्रंथ तसेच चार वेद आणि अठरा पुराणांचे संपादन करून संपूर्ण जगाला ज्ञानरूपी प्रकाश देणारे थोर महर्षी वेद व्यास यांचा जन्म याच दिवशी झाला होता. या पवित्र दिवशी शिष्यमंडळी आपल्या गुरूंचे पाय धुऊन त्यांचे मनोभावे पूजन करतात आणि आशीर्वाद घेतात. याचबरोबर, एखाद्या पवित्र नदीत स्नान करून गरजू व्यक्तींना सढळ हाताने दानधर्म केल्यास सर्व पापांचा नाश होतो आणि मनावरील सर्व नकारात्मकतेचे मळभ कायमचे दूर होते, अशी मान्यता आहे.



# श्री स्वामी समर्थांच्या नित्यपूजेतील दत्तप्रभूंची दिव्य मूर्ती...

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सदर भगवान दत्तप्रभूंची मूर्ती ३५० वर्षांपूर्वीची आहे. दत्तप्रभूंची ही मूर्ती श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पूजेत होती. नंतर त्यांनी त्यांचे शिष्य चिदंबर दीक्षित यांना दिली. पुढे चिदंबर दीक्षित यांनी ही मूर्ती त्यांचे शिष्य नागलिंग स्वामी (कर्नाटक) यांना दिली. पुढे नागलिंग स्वामी यांनी मूर्ती नामदेव महाराज चहाण यांना दिली व करवीर क्षेत्री जाण्यास सांगितले तेथे साक्षात दत्तप्रभू भेटतील, असे सांगितले. ही मूर्ती घेऊन श्री नामदेव महाराज करवीर क्षेत्री (कोल्हापूर) आले. तेथे त्यांची गंगावेशेत शेषनारायण मंदिराजवळ दत्त अवतारी श्री कृष्ण सरस्वती महाराजांशी गाठ पडली.

या मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे दत्तप्रभूंची मूर्ती किंवा फोटो हे ब्रह्मा, विष्णू, महेश असे असतात. पण मूर्तीत महेश मध्यभागी आहे. म्हणजे ब्रह्मा, महेश, विष्णू अशी एकमेव गुरू- शिष्य परंपरा आहे. सदर मूर्ती दोनदा चोरीस गेली होती. तेव्हा दत्त महाराजांनी श्री नामदेव महाराजांच्या स्वप्नात दृष्टांत देऊन अंबाबाई मंदिराजवळील जुने वणक्रूद्रेचे भांड्याच्या दुकानातून घेऊन जायला सांगितले. तेव्हा २०० रुपये देऊन ही मूर्ती श्री नामदेव महाराजांनी परत घेतली.

आज ही मूर्ती कोल्हापुरात शुक्रवार पेठेत पंचगंगा रोड येथे श्री नामदेव महाराजांच्या मठी येथे पाहावयास मिळते.

# हम गया नहीं जिंदा है... असे म्हणणाऱ्या स्वामींचा देहत्यागाचा तो दिवस नक्की काय होता? कसा होता तो प्रसंग?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

मंगळवार, दि. ३० एप्रिल १८७८ या दिवशी स्वामींनी देह ठेवला. संपूर्ण अक्कलकोटात शांतता पसरली. दुःख पसरले.

स्वामी मुळात एक वेगळाच अवलिया होते, असे म्हणतात. ते कधी-कधी सात-आठ दिवस अंघोळ करत नसत आणि वाटले तर एकाच दिवसात चार-चार वेळा अंघोळ करत. अगदी लहान हट्टी बालक कसा असावा तसे स्वामी होते असे म्हणतात.

मंगळवार, दि. ३० एप्रिल १८७८ चा तो दिवस. गेले १४-१५ दिवस स्वामींची नित्य लक्षणे बदलली. १०-१२ दिवस त्यांनी काही खाल्ले नव्हते. अशातच मंगळवारी दुपारी काकूबाई आणि भक्तांच्या विनवणी वरून स्वामींनी थोडी पेज घेतली. त्यानंतर बाळप्पा महाराजांनी स्वामींना सुपारी दिली आणि झोपण्यास विनंती केली. अक्कलकोट संस्थानांच्या राणीही त्यावेळी तेथे होत्या. स्वामींनी पेज घेतली आणि राणींनाही थोडा दिलासा मिळाला. आणि आता काही भय नाही हे समजून त्या वाड्यात परतल्या.

स्वामींची ही परिस्थिती पाहून स्वामींचे अन्य सेवेकरी बाळप्पा महाराज यांना वेगळीच शंका येऊ लागली होती. त्यामुळे त्यांनी स्वामींच्या काही भक्तांना तार केली होती. त्यानुसारच मुंबईचे केशव नाईक आपल्या मुलासमवेत अक्कलकोट येथे हजर होते. त्यांनी पाहिले की संपूर्ण अक्कलकोटची गती थांबल्यासारखी झाली होती. नगरात सर्वांचे चेहरे पडले होते. चोळप्पा महाराजांच्या मठातील भागीरथी नावाची गाय आणि तिचे वासरू सारखे हंबरत होते. पाहावा व सहन न व्हावा असा त्यांचा तो हंबरडा. जीवाच्या आकांताने त्यांचा तो हंबरडा स्वामींना साद घालत होता. स्वामी वडाखाली होते. दुपारी एकच्या सुमारास त्यांनी आपल्या सर्व जनावरांना समोर आणण्यास सांगितले.

हे कानी पडले आणि सर्व सेवेकरी आणखी अस्वस्थ झाले. परंतु स्वामींची आज्ञा. त्यामुळे त्यांनी सर्व जनावरांना स्वामींच्या समोर आणले. त्या दिवशीचा जो काही नैवेद्य स्वामींनी जनावरांना द्या, असे सांगितले आणि यासोबतच आपली सर्व वस्त्रे स्वामींनी त्या मुक्या जनावरांना घालण्यास सांगितले. जणू त्या प्राण्यांना त्या दिवसाची पूर्वकल्पना आली होती. त्या मुक्या प्राण्यांच्या डोळ्यांतून निरंतर अश्रू येत होते. स्वामींनी त्या जनावरांच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवला. जणू स्वामींचा हा स्पर्श ही धाप पुन्हा मिळणार नाही म्हणून ती जनावरे हंबरडा फोडत होती. त्यानंतर स्वामी पुन्हा पलंगाजवळ आले आणि बसले. स्वामींची ही लीला पाहून भक्तांच्या हृदयाचा ठोका चुकला. सर्व जण नजर चुकवून मनातल्या मनात आक्रोश करत होते.



स्वामींनी उशीकडे इशारा करताच त्यांना लगेच उशी दिली. श्रीपाद भटजी यांनी त्यांना व्यवस्थित बसविले. स्वामी स्वामी-स्वतिकासनात स्थानापन्न झाले. स्वामी मागे टेकले आणि स्वामींनी आपले नेत्र मिटून घेतले. बाजूलाच वैद्यराज होते. त्यांनी स्वामींची नाडी पाहिली ती लागेनाशी झाली.

तो वैद्य अस्वस्थ झाला- गडबडला... त्यांचे गडबडणे पाहून संपूर्ण परिसरात आक्रोश सुरू झाला. हजारो भाविकांना आपला हुंदका आवरता आला नाही. अनेकजण लोळत होते. अनेक स्त्रिया स्वतःचे केस उपटत होते. तो आक्रोश असहाय्य आणि प्रचंड होता. भुजंगा नावाचा स्वामींचा सेवेकरी आपले डोके आपटून घेत होता.

स्वामींची कुठेतरी हालचाल व्हावी आणि आपण पाहावी म्हणून प्रत्येक जण स्वामींकडे पाहत होता. स्वामींना डोळ्यात साठवून घेत होते. स्वामींच्या लीला सर्वांच्या डोळ्यासमोर होत्या. अनेक भक्तांच्या मदतीची हाक आणि दुःख आणि संकटातून बाहेर काढणारा तो दिव्य देह आज शांत पडला होता. प्रत्येक जण स्वामींना मनातल्या मनात विचारत होते की स्वामी आता तुमच्या या लेकरांनी कुठे जावे? आणि इतक्यात एक सुखद क्षण असा आला.

स्वामींनी आपले डोळे सहजच उघडले आणि ते प्रेमाने सर्वांना न्याहाळू लागले. इतका उशीर चालू असलेला आक्रोक्ष क्षणार्धात शांत झाला. जमलेले सगळे भक्त आशेने दोन पावले स्वामींच्या पलंगाजवळ सरकले. त्यावेळी श्रीकृष्ण यांचे एक अद्भुत वचन (भगवद्गीता नववा अध्याय २२ वा श्लोक) स्वामींच्या मुखातून निघाले.

**अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्॥**

म्हणजेच जो अनन्य भावे मला शरण येतो माझी उपासना करतो तो पूर्ण मुक्तीचा सोहळा पाहिलं...

जीवन कसे जगावे याची कला त्याला आत्मसात होईल...

कोण जो माझ्यावर पूर्णपणे विसंबला ज्याने संपूर्ण जीवन मला समर्पिले आहे तो...

समर्थांच्या या वचनात सर्व भक्त भारावून गेले. स्वामींचा प्रत्येक शब्द अगदी कान एकवटून सर्व जण ऐकत होते. स्वामींनी आशीर्वाद देण्यासाठी हात वर केले आणि पुढच्याच क्षणी ती स्वप्नांसारखा भास संपला.

अंतसमयी स्वामींच्या मुखातून खसखशी एवढे तीन दाने बाहेर पडले. नंतर दरबार मंडळींच्या आग्रहाखातर स्वामींचा दिव्य देह पेठेतील मठाच्या त्यागभूमीमध्ये ठेवण्यात आला. वाजतगाजत ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुकीने स्वामींच्या समाधीलीलेस अंतिम स्वरूप दिले. सर्व अक्कलकोट दुःख सागरात त्या दिवशी बुडाले. त्यानंतर बाळप्पा महाराज सलग तीन दिवस समाधीत उतरून स्वामींची पूजा करत होता. नंतर तीन दिवसांनी दगड लावून समाधी बंद करण्यात आली.

हम गया नहीं जिंदा है हे वाक्य आजही स्वामीभक्त अनुभवतात. अनेक भक्तांना याची प्रचिती येते.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)